निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत.
श्री. सुरज मनीराम चव्हाण तत्कालीन विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती कर्जत हल्ली कार्यतर पंचायत समिती अकोले

अहिल्यानगर जिल्हा परिषद
कृषि विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र कृषि /अस्था-२/४१२/२०२५
अहिल्यानगर दिनांक ~~खाली नमुद केलेनुसार~~ 02/12/2025

वाचा:-१. इकडील निलंबन आदेश क्र. कृषि/आस्था/३४९/२०१८ दि.१९/०३/२०१८
२. इकडील ज्ञापन/दोषारोपपत्र क्रमांक कृषि/आस्था/२१५/२०१९ दि.२१/०२/२०१९
३. श्री. सुरज मनीराम चव्हाण यांचेकडील खुलासा दि १४/०३/२०१९
४. इकडील चौकशी अधिकारी नेमणुक आदेश क्र.कृषि/आस्था/७१६/२०१९ दिनांक १९/६/२०१९
५. सादरकर्ता अधिकारी नेमणुक आदेश जा.क्र. क्र.कृषि/आस्था/७१७/२०१९ दिनांक १९/६/२०१९
६ सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र. विशा.४/खाचौ/ सी.आर.९१/२०१९ दि १६ एप्रिल२०२० प्राप्त दि २५/०९/२०२०
७.या कार्यालयचा सेवेत पुन:स्थापित करणे बाबतचा आदेश क्र. कृषि/आस्था/१०२/२०२० दि.२७/०१/२०२०
८..मा.अति.सत्र न्यायाधिश कोर्ट नं.१ नांदेड यांचेकडील स्पे.केस नं.एसबी १४/२०१९ मधील निशाणी २७४ वरील आदेश दि.८/८/२०२४
९. या कार्यालयाचा आदेश क्र.कृषि/१७४/२०२५ अहिल्यानगर दिनांक २१/०४/२०२५
१०. इकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.कृषि /आस्था-२ /२८६/२०२५ दिनांक २७/०६/२०२५
११. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था-१/२०१९/२०२५ दिनांक ०७/०८/२०२५ समवेत श्री चव्हाण यांचा खुलासा
१२.महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम (३), (४), (५)

श्री.सुरज मनिराम चव्हाण विस्तार अधिकारी (कृषि ) यांचे हलगर्जीपणा इत्यादी गैरवर्तन केल्याने संदर्भ क्रमांक १ अन्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करणेत आले होते.

संदर्भ क्रमांक २ अन्वये सदर प्रकरणी श्री चव्हाण .यांना ज्ञापन दोषारोपपत्र बजावणेत येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. संदर्भ क्र.३ चे खुलाशात श्री चव्हाण यांनी त्यांचेवर दोषारोपपत्रात ठेवण्यात आलेले आरोप अमान्य केलेने संदर्भ क्र ४ व ५ नुसार , श्री चव्हाण .यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेत आली. संदर्भ क्र.६ चे सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील चौकशी पुर्ण करुन श्रीचव्हाण यांच्या प्रकरणी पोलिस विभागाचा तपास व न्याय निर्णयाची कार्यवाही प्रलंबित असल्याने सदर प्रकारणी न्यायालयीन निकालानंतर निर्णय घेणे संयुक्तीक होणार आहे. सबब आरोप सिध्द होतो असा निष्कर्ष दिलेला आहे. तरी श्री .सुरज मनिराम चव्हाण यांचेवरील गैरवर्तनाबाबत दोषारोप, विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष व श्री चव्हाण यांचे विरुध्द दाखल गुन्हयासंदर्भात मा.अति.सत्र न्यायाधीश कोर्ट न १ नांदेड यांचेकडील स्पे.केस नं.एसबी१४/२०१९ मधील २७४ वरील आदेश दिनांक ८/८/२०२४ अन्वये निकाल पारित केला असुन सदर गुन्हयातून श्री सुरज मनिराम चव्हाण वि.अ.(कृषि) यांची निर्दोष मुक्तता केलेली आहे. त्यानुसार श्री चव्हाण यांना संदर्भ क्र.९ अन्वये शिस्तभंगविषयक कार्यवाहीतून दोषमुक्त करण्यात आले आहे.

श्री सुरज मनिराम चव्हाण वि.अ.(कृषि) यांचा दिनांक ०६/०३/२०१८ ते दिनांक २८/०१/२०२० अखेर एकुण १ वर्ष १० महिने २२ दिवस (एकुण ६९४) दिवस सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती.

या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक १० नुसार श्री सुरज मनिराम चव्हाण वि.अ.(कृषि) यांना नोटीस बजावुन खुलासा मागविणेत आला होता. श्री चव्हाण यांनी संदर्भ क्रमांक ११ नुसार खुलासा सादर करुन त्यांना प्रकरणी दोषमुक्त करणेत आलेले असलेने त्यांचा सेवा निलंबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ सेवा कालावधी म्हणुन ग्राह्य धरणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

संदर्भ क्रमांक ९ नुसार श्री सुरज मनिराम चव्हाण वि.अ.(कृषि) यांना सदर प्रकरणी दोषमुक्त करणेत आलेले असलेचे पाहता संदर्भ क्रमांक १२ मध्ये नमुद केलेल्या नियमातील तरतुदीनुसार निम्न स्वाक्षरीत नियुक्ती प्राधिकरणास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, श्री सुरज मनिराम चव्हाण वि.अ.(कृषि) यांचा दिनांक ०६/०३/२०१८ ते दिनांक २८/०१/२०२० अखेर एकुण ६९४ दिवस सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ सेवा कालावधी म्हणुन धरण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री सुरज मनिराम चव्हाण वि.अ.(कृषि) यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202512020910024 असा आहे.

Signed by Anand Subhashlal Bhandari
Date: 28-11-2025 18:33:43
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री सुरज मनिराम चव्हाण ,विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती अकोले
द्वारा :- गट विकास अधिकारी, पंचायत अकोले
२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत :- निवडनस्ती.

Scanned with OKEN Scanner